प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. 02.04.2021

**सिडकोतर्फे द्रोणागिरी आणि कळंबोली येथे उभारण्यात आलेल्या कोविड-19 समर्पित रुग्णालयांचे श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ई-लोकार्पण**

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबईतील पनवेल व उरण परिसरातील कोविड-19 रुग्णांच्या उपचारासाठी सिडको महामंडळातर्फे अल्पावधीत कळंबोली, सेक्टर-5ई आणि सिडको प्रशिक्षण केंद्र, द्रोणागिरी येथे उभारण्यात आलेल्या सुसज्ज कोविड समर्पित रुग्णालयांचे 2 एप्रिल 2021 रोजी **श्री. एकनाथ शिंदे**, मंत्री, नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांच्या शुभहस्ते दूरस्थ पद्धतीने (ऑनलाइन) ई-लोकार्पण करण्यात आले.

सदर रुग्णालयांच्या उभारणीकरिता **श्री. उद्धव ठाकरे**, मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, **श्री. एकनाथ शिंदे**, मंत्री, नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा आणि **श्रीमती अदिती तटकरे**, राज्यमंत्री, उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय तथा पालकमंत्री, रायगड जिल्हा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या प्रसंगी **श्रीमती अदिती तटकरे**, राज्यमंत्री, उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय तथा पालकमंत्री, रायगड जिल्हा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच **श्री. श्रीरंग बारणे**, लोकसभा सदस्य, मावळ, **श्री. निरंजन डावखरे**, विधानपरिषद सदस्य, **श्री. बाळाराम पाटील**, विधानपरिषद सदस्य, **डॉ. संजय मुखर्जी**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, **श्री. सुधाकर देशमुख**, आयुक्त, पनवेल महानगरपालिका, **श्री. अश्विन मुद्गल**, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, **श्री. एस. एस. पाटील**, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको आणि **श्री. राजेंद्र धायटकर**, मुख्य अभियंता, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

नवी मुंबईच्या पनवेल व उरण परिसरातील वाढत्या कोविड-19 बाधित रुग्णांवर उपचार करण्याकरिता अल्पावधीत सुसज्ज असे कोविड-19 समर्पित रुग्णालय उभारण्याचे निर्देश महाराष्ट्र शासनातर्फे सिडकोला देण्यात आले होते. त्यानुसार सिडकोने तातडीची कार्यवाही करत कळंबोली, सेक्टर-5ई येथील समाज मंदिरात यापूर्वी कार्यरत असलेले पनवेल महानगरपालिकेचे नागरी आरोग्य केंद्र, व्यायामशाळा, महिला बचतगट इ. स्थलांतर करून अवघ्या 30 दिवसांत 60 ऑक्सिजनयुक्त खाटा आणि 12 अतिदक्षता

खाटांसह एकूण 72 खाटांचे अत्याधुनिक सोयींनी सुसज्ज असे कोविड-19 समर्पित रुग्णालय उभारले. या रुग्णालयाच्या उभारणीसाठी सिडकोकडून एकूण रु. 5 कोटी खर्च करण्यात आला. या रुग्णालयात पेशंट फ्लो अशा रीतीने निर्धारित करण्यात आला आहे की, जेणेकरून त्या ठिकाणी काम करणाऱ्या डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांना कोरोनाचा संसर्ग होणार नाही. याकरिता स्पर्शरहित प्रणालीही (कॉन्टॅक्टलेस सिस्टीम) तयार करण्यात आली आहे. याशिवाय, आयसीयु व्हेंटिलेटर, हाय फ्लो नेजल कॅन्युला, सेंट्रली डिस्ट्रिब्युटेड ऑक्सिजन फॅसिलिटी, एक्सरे, सीआर सिस्टीम आणि रुग्णांसाठी स्पर्शरहित देखरेख या सुविधाही येथे उपलब्ध आहेत.

सदर रुग्णालयाच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर ऑक्सिजनयुक्त एकूण 60 खाटांची सुविधा उपलब्ध आहे. ऑक्सिजन पुरवठा करण्यासाठी 800 लिटरच्या सिलेंडरची व अतिरिक्त 6 सिलेंडरची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे स्वयंचलित ऑक्सिजन पुरवठा अविरतपणे चालू राहिल. तसेच रुग्णालयासाठी लागणाऱ्या निकषांप्रमाणे अग्निशमन प्रणालीही उपलब्ध केली आहे. रुग्ण व्यवस्थापनासाठी आवश्यक त्या माहिती तंत्रज्ञान पायाभूत सुविधा आणि हाय स्पीड इंटरनेट लीज लाइनची व्यवस्था करण्यात आली आहे. रुग्णांसाठी प्रत्येक मजल्यावर गरम पाणी तसेच आरओ/युव्ही पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच रुग्णांची सुरक्षा व्यवस्था, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे व अन्य पायाभूत सुविधा पनवेल महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सदर कोविड-19 समर्पित रुग्णालय/केंद्राचे आज दि. 2 एप्रिल 2021 रोजी पनवेल महानगरपालिकेस संचालनासाठी हस्तांतरण करण्यात आले.

याशिवाय सिडकोतर्फे द्रोणागिरी येथील सिडको प्रशिक्षण केंद्रामध्ये नवी मुंबईतील दुसरे, 50 ऑक्सिजनयुक्त खाटांचे कोविड-19 समर्पित रुग्णालय अवघ्या 25 दिवसांमध्ये उभारण्यात आले आहे. या रुग्णालयाच्या उभारणीकरिता सिडकोकडून रु. 73 लक्ष खर्च करण्यात आला असून सदर रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांना हस्तांतरण करण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी, सिडको**